# राज्यपालांच्या हस्ते अटल बिहारी वाजपेयी यांच्यावरील 'अटल संस्मरण'चे प्रकाशन

## नेतृत्वगुण शिकायचे असतील तर अटलजींचे जीवन अभ्यासावे - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई - अटल बिहारी वाजपेयी यांच्या व्यक्तिमत्वामुळे प्रेरित होऊन आपण राजकारणात आलो. भावी पिढ्यांना नेतृत्वगुण, राजकारणातील शालीनता व नीतिमत्ता शिकायची असेल तर त्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांचे सार्वजनिक जीवन अभ्यासावे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

वाजपेयी यांच्या राजकारण तसेच सार्वजनिक जीवनासंबंधी आठवणींचे संकलन असलेल्या 'अटल संस्मरण' या ग्रंथाचे प्रकाशन राज्यपालांच्या मुख्य उपस्थितीत महाराष्ट्र लोकभवन येथे झाले, त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे माध्यम सल्लागार म्हणून कार्य केलेल्या अशोक टंडन यांनी हे पुस्तक लिहिले असून वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ते प्रकाशित करण्यात आले आहे.




नेता कसा असावा, विरोधी पक्षनेता कसा असावा याचे अटलजी मूर्तिमंत उदाहरण होते असे सांगून अटल बिहारी वाजपेयी उत्कृष्ट वक्ते होते व थोर विचारवंत होते असे राज्यपालांनी सांगितले.

उत्तरपूर्वेकडील राज्यात कठीण परिस्थितीत पक्षाचे काम करीत असताना अटलजी आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना प्रेरणा देत. भेटीस गेल्यास उत्तरपूर्वेकडील नेत्यांना अगोदर भेटत. विरोधी पक्षात असताना अटलजी जसे होते तसेच ते पंतप्रधान झाल्यावर देखील होते असे राज्यपालांनी सांगितले. तेरा दिवसांचे सरकार संकटात असताना देखील त्यांनी वैचारिक बांधिलकी सोडली नाही.

संसदेचे अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी यांनी अटलजींना एकदा 'आपण नेहमी म्हणता त्या 'भारतीयतेची' व्याख्या काय आहे असे विचारले होते. त्यावर अटलजींनी 'आपण बंगाल मधील असून देखील आपले नाम 'सोमनाथ' हे पश्चिमेकडील आहे, हीच भारतीयता आहे', असे सांगितल्याचे राज्यपालांनी नमूद केले.

आज सर्वत्र नैतिकतेचा ऱ्हास होत असल्याचे नमूद करून कृत्रिम बुद्धिमत्ता असो किंवा अणुऊर्जा असो, वापर करणाऱ्याकडे नीतिमत्ता व मूल्ये असली पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. आजकाल लोकांना कमी वेळात नेता व्हायचे असते. अटलजींनी राजकारणात कधीही 'शॉर्टकट' स्वीकारला नाही, असे राज्यपालांनी सांगितले.

**'अटल संस्मरण प्रेरणादायी, अंतर्मुख करणारे': सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार**

यावेळी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी 'अटल संस्मरण' हा उच्च साहित्यिक मूल्य असलेला अटलजींच्या जीवनावरील महत्वपूर्ण दस्तावेज असल्याचे सांगितले. लेखक अशोक टंडन यांनी अनेक वर्षे अटलजींसोबत काम केले असल्यामुळे त्यांचे पुस्तक वस्तुनिष्ठ, प्रेरणादायी व अंतर्मुख करणारे झाले आहे असे शेलार यांनी सांगितले.

अटलजींचे जीवन संघर्षमय होते. ते अमोघ वक्ते व सुसंस्कृत राजकारणी होते. लोकशाही हे संवादाचे माध्यम आहे हे त्यांनी दाखवून दिले. सहमतीने राजकारण हीच त्यांची शिकवण आहे असे मंत्री शेलार यांनी सांगितले.

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अटलजींचे राजकीय जीवन गेले. परंतु त्यांच्या आचार विचारात कोठेही कटुता नव्हती. कवी हृदय व मेणासारखे मऊ असणारे अटलजी प्रसंगी वज्रासारखे कठीण होत. अटलजींनी देशाला अणुऊर्जा संपन्न केल्यावर अनेक देशांनी भारतावर निर्बंध लादले तरी देखील ते डगमगले नाही, असे त्यांनी सांगितले. आपण अटलजींसोबत सहा वर्षे काम केले व पंतप्रधान पदावरून निवृत्त झाल्यावर देखील त्यांच्या संपर्कात होतो असे सांगून लेखक अशोक टंडन यांनी अटलजींचे १३ दिवसांचे सरकार कसे बनले तसेच कम्युनिस्टांनी त्याकाळात कसे राजकारण यासंबंधी किस्से सांगितले.

जन्मशताब्दी वर्षानिमित्त हे पुस्तक काढले असून ती वाजपेयी यांना श्रद्धांजली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला गायक अनुप जलोटा, रवींद्र संघवी, बिनॉय बी. यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' निमित्त त्र्यंबकेश्वर येथे भक्ती, संस्कृती, परंपरेचा दिव्य आविष्कार

## ६ जुलै रोजी त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात अभिनेत्री संस्कृती बालगुडे यांचे सादरीकरण

ज्योतिर्मय साहित्य

मुंबई - महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' निमित्त सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, अध्यात्म आणि परंपरेचा गौरव जनमानसापर्यंत पोहोचविणे तसेच सांस्कृतिक मूल्यांविषयी जनजागृती करणे, हा या कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

'सोमनाथ स्वाभिमान पर्व' हा भारतीय सांस्कृतिक अस्मिता, अखंड श्रद्धा आणि आध्यात्मिक परंपरेचा गौरव करणारा महत्वपूर्ण उपक्रम आहे. या पर्वाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीच्या शाश्वत मूल्यांची जपणूक करण्याबरोबरच भावी पिढीपर्यंत आपल्या परंपरा आणि संस्कारांचा वारसा पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये अभिनेत्री संस्कृती बालगुडे यांचे विशेष सादरीकरण होणार असून, त्यांच्या प्रभावी अभिव्यक्ती आणि कलात्मक सादरीकरणातून भक्ती, अध्यात्म, संस्कृती आणि भारतीय परंपरेचे विविध पैलू रसिकांसमोर उलगडले जाणार आहेत.

भारतीय संस्कृतीमध्ये मंदिर परिसर हा केवळ धार्मिक श्रद्धेचा केंद्रबिंदू नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा अविभाज्य घटक राहिला आहे. त्र्यंबकेश्वरच्या पवित्र आणि ऐतिहासिक वातावरणात सादर होणारा हा कार्यक्रम अध्यात्म आणि कलेचा सुंदर मिलाफ अनुभवण्याची संधी उपस्थितांना उपलब्ध करून देणार आहे.

कार्यक्रमाच्या माध्यमातून भारतीय भक्तीपरंपरेतील विविध भावविश्व, आध्यात्मिक विचार आणि सांस्कृतिक मूल्यांचे कलात्मक दर्शन घडणार आहे. संगीत, अभिव्यक्ती आणि सांस्कृतिक सादरीकरणाच्या माध्यमातून भारतीय परंपरेतील समन्वय, सहिष्णुता आणि अध्यात्मिकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात येणार आहे.

त्र्यंबकेश्वर मंदिराच्या पवित्र परिसरात आयोजित हा कार्यक्रम उपस्थितांना सांस्कृतिक वारशाचा अनुभव देण्याबरोबरच भारतीय संस्कृतीतील अध्यात्मिक समृद्धी आणि परंपरेची जाणीव अधिक दृढ करणारा ठरणार आहे. श्रद्धा, संस्कृती आणि कला यांचा संगम असलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरण्याची अपेक्षा आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. भारतीय संस्कृतीतील अध्यात्म, श्रद्धा आणि परंपरेचा गौरव समाजापर्यंत पोहोचविणे, सांस्कृतिक मूल्यांचे जतन व संवर्धन करणे तसेच आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमास सर्व नागरिकांसाठी विनामूल्य असून, त्र्यंबकेश्वरच्या पावन भूमीत साकार होणाऱ्या भक्ती, संस्कृती आणि परंपरेच्या या वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी भाविक, कला रसिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

# आमूलाग्र परिवर्तनाची गरज ...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

६. संत ज्ञानेश्वरांचा दृष्टिकोन

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।।

ज्ञानाचे अंतिम फळ म्हणजे सर्वांमध्ये परमेश्वराचे दर्शन. जर कथा ऐकून अहंकार, द्वेष, मत्सर आणि विभाजन वाढत असेल, तर ते अध्यात्म नव्हे.

**७. संत तुकाराम महाराजांचे मत**

संत तुकाराम महाराज म्हणतात

बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।।

यापेक्षा कथावाचकासाठी मोठा निकष दुसरा नाही.

उपदेश आणि आचरण यांची एकरूपता हाच संतधर्म आहे.

**८. समर्थ रामदासस्वामींचा उपदेश**

समर्थ रामदास म्हणतात आधी केले मग सांगितले।

स्वतः आचरून मगच उपदेश करावा.

भारतीय संतपरंपरेत शब्दापेक्षा जीवनाला अधिक महत्त्व आहे.

**९. कथा दिशाहीन कधी होते?**

कथा पुढील कारणांनी मूळ उद्देशापासून दूर जाऊ शकते

शास्त्राऐवजी व्यक्तिकेंद्री प्रचार. धर्मशिक्षणा ऐवजी मनोरंजन. वैराग्या ऐवजी वैभवाचे प्रदर्शन.

आत्मचिंतना ऐवजी चमत्कारांचा प्रचार.

सदाचारा ऐवजी लोकप्रियतेचा आग्रह.

सेवाभावा ऐवजी आर्थिक स्पर्धा. ही निरीक्षणे सर्व कथावाचकांना लागू नसून आत्मपरीक्षणासाठी आहेत.

**१०. आदर्श कथावाचकाचे स्वरूप**

शास्त्रानुसार कथावाचक - वेद-पुराणांचा अभ्यासक असावा. विनम्र असावा. निष्काम वृत्तीचा असावा. स्वतः सदाचारी असावा.

श्रोत्यांना धर्माचरणासाठी प्रेरित करणारा असावा.

समाजात समता, करुणा आणि सद्भाव वाढवणारा असावा.

**११. आदर्श श्रोत्याची जबाबदारी**

श्रोत्याने - श्रद्धेने श्रवण करावे. विवेकाने मनन करावे. दोष स्वतःमध्ये शोधावेत. धर्म आचरणात आणावा. सतत आत्मपरीक्षण करावे.

कथा ऐकूनही जीवनात बदल न घडल्यास दोष केवळ कथावाचकाचा नसतो.

**१२. आज कथा जगभर पोहोचत आहे**

दूरचित्रवाणी, सामाजिक माध्यमे, डिजिटल व्यासपीठे, भव्य धार्मिक महोत्सव. ही संधी जितकी मोठी आहे, तितकीच जबाबदारीही मोठी आहे. लोकप्रियतेपेक्षा लोकपरिवर्तन अधिक महत्त्वाचे आहे.

इतिहास साक्षी आहे की अनेक ऋषी, संत, आचार्य, कीर्तनकार आणि कथावाचकांनी समाजात महान परिवर्तन घडवले. म्हणून ''सर्व कथावाचक निष्प्रभावी आहेत'' असा निष्कर्ष शास्त्रसंगत नाही.

परंतु कथा ऐकून धर्म, सदाचार, संयम, सत्य, करुणा, सेवाभाव आणि ईश्वरभक्ती वाढत नसेल, तर कथा-परंपरेने आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे.

१. श्रीमद्भागवत महापुराण (१.२.१७)

शृण्वतां स्वकथाः कृष्णः पुण्यश्रवणकीर्तनः ।हृद्यन्तःस्थो ह्यभद्राणि विधुनोति सुहृत्सताम् ।।

जे श्रद्धेने भगवानाच्या कथांचे श्रवण करतात, त्यांच्या अंतःकरणातील पाप, वासनारूप मल आणि अशुद्ध संस्कार भगवान स्वतः नष्ट करतात.

कथा ही केवळ माहिती देण्यासाठी नसून अंतःकरणशुद्धी करण्यासाठी आहे. कथा ऐकून मन शुद्ध झाले, तरच तिचे प्रयोजन सिद्ध होते.

२. श्रीमद्भागवत महापुराण (१.२.१८)

नष्टप्रायेष्वभद्रेषु नित्यं भागवतसेवया ।भगवत्युत्तमश्लोके भक्तिर्भवति नैष्ठिकी ।।

भागवताचे नित्य श्रवण-सेवन केल्याने अंतःकरणातील दोष नाहीसे होतात आणि दृढ भक्ती उत्पन्न होते.

श्रवणाचा परिणाम स्थिर भक्ती असला पाहिजे. जर कथा संपली आणि जीवन पूर्ववत राहिले, तर श्रवण अद्याप अंतर्मुख झालेले नाही.

३. भगवद्गीता (४.३४)

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ।।

विनय, जिज्ञासा आणि सेवाभावाने तत्त्वदर्शी गुरुंकडे जा; ते तुला सत्यज्ञान देतील. कथा ऐकणे म्हणजे निष्क्रिय मनोरंजन नव्हे. त्यासाठी विनय, जिज्ञासा आणि आचरणाची तयारी आवश्यक आहे.

४. भगवद्गीता (३.२१)

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।।

श्रेष्ठ पुरुष जसे आचरण करतात, तसेच समाजही करतो. कथावाचकाचे जीवनच त्याचा सर्वात प्रभावी उपदेश असते. शब्दांपेक्षा आचरण अधिक बोलके असते.

५. कठोपनिषद् (१.२.२३)

नायमात्मा प्रवचनेन लभ्योन मेधया न बहुना श्रुतेन ।यमेवैष वृणुते तेन लभ्यःतस्यैष आत्मा विवृणुते तनूं स्वाम् ।।

आत्मज्ञान केवळ प्रवचन, बुद्धिमत्ता किंवा भरपूर श्रवणाने प्राप्त होत नाही; पात्रता, साधना आणि ईश्वरकृपा आवश्यक असते.

प्रवचन हे साधन आहे, साध्य नाही. कथा जीवनात उतरल्याशिवाय आत्मज्ञानाचा मार्ग खुला होत नाही.

६. मुण्डकोपनिषद् (१.२.१२)

तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।।

परमसत्य जाणण्यासाठी श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ गुरुंकडे जावे.

आदर्श कथावाचक हा केवळ वक्ता नसून शास्त्रपारंगत आणि आचरणशील असावा.

७. श्रीमद्भागवत (१.५.११)

तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवोयस्मिन् प्रतिश्लोकमबद्धवत्यपि । नामान्यनन्तस्य यशोऽङ्कितानि यत्शृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ।।



भगवंताच्या यशाने युक्त वाणी लोकांच्या पापांचा नाश करणारी असते, जरी तिची साहित्यरचना परिपूर्ण नसली तरी.

वक्तृत्वकौशल्यापेक्षा भगवद्भाव आणि सत्य अधिक प्रभावी असतात.

८. विवेकचूडामणि

चित्तस्य शुद्धये कर्म न तु वस्तूपलब्धये ।


कर्माचे उद्दिष्ट चित्तशुद्धी आहे; ब्रह्मज्ञानाची थेट प्राप्ती नव्हे.

कथा, पूजा, यज्ञ, कीर्तन - या सर्व साधनांचे पहिले फळ म्हणजे मनशुद्धी. मन शुद्ध झाल्यावरच ज्ञान आणि भक्ती स्थिर होतात.

९. संत तुकाराम महाराज

बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।।

संतपरंपरेने कथावाचकासाठी सर्वात मोठा निकष सांगितला आहे - वाणी आणि आचरण यांचे ऐक्य.




१०. संत ज्ञानेश्वर महाराज

जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।

कथेचे अंतिम फळ म्हणजे सर्व जीवांमध्ये परमेश्वराचे दर्शन, करुणा, समता आणि प्रेम जागृत होणे.

देवर्षी नारद - महर्षी वेदव्यास संवाद : कथा-श्रवणाचे तत्त्वज्ञान

१. प्रसंग

महर्षी वेदव्यासांनी वेदांचे विभाजन केले, महाभारत, ब्रह्मसूत्रे आणि अनेक पुराणांची रचना केली. तरीही त्यांच्या अंतःकरणात समाधान नव्हते. तेव्हा देवर्षी नारद त्यांच्या आश्रमात आले आणि या असमाधानाचे कारण स्पष्ट केले.

२. नारदांचा उपदेश (श्रीमद्भागवत १.५.८)

भवतानुदितप्रायं यशो भगवतोऽमलम् ।

येनैवासौ न तुष्येत मन्ये तद्दर्शनं खिलम् ।।

''हे व्यासमुनी! आपण अनेक ग्रंथ लिहिले, परंतु भगवानाच्या निर्मळ, पवित्र यशाचे पर्याप्त वर्णन केले नाही. त्यामुळेच आपल्या अंतःकरणाला समाधान लाभलेले नाही.''

तात्त्विक भाष्य

नारदांचा संदेश असा आहे की शास्त्ररचना, विद्वत्ता किंवा प्रभावी वक्तृत्व यांचे अंतिम मूल्य भगवद्भक्ती जागृत करण्यात आहे. ईश्वरकेंद्रितता नसलेले ज्ञान अपूर्ण राहते.

३. कथेचे खरे सामर्थ्य (श्रीमद्भागवत १.५.११)

तद्वाग्विसर्गो जनताघविप्लवो

यस्मिन् प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।

नामान्यनन्तस्य यशोऽङ्कितानि यत्

शृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ।।

भगवंताच्या नाम-यशाने युक्त वाणी, जरी साहित्यदृष्ट्या परिपूर्ण नसली तरी लोकांच्या पापवृत्तींचा नाश करणारी असते. सज्जन ती ऐकतात, गातात आणि स्वीकारतात.

तात्त्विक भाष्य

येथे नारदांनी स्पष्ट केले आहे की कथेचे सामर्थ्य तिच्या अलंकारिक भाषेत नसून, ती श्रोत्यांच्या अंतःकरणात घडवणाऱ्या परिवर्तनात आहे.

४. केवळ विद्वत्ता अपुरी

(श्रीमद्भागवत १.५.१२)

नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं

न शोभते ज्ञानमलं निरञ्जनम् ।

भगवंतावरील भक्तिभावाशिवाय निष्काम कर्म किंवा निर्मळ ज्ञानही पूर्ण शोभत नाही.

ज्ञान, प्रवचन, तर्क किंवा अभ्यास यांचे सार भक्ती आणि आत्मपरिवर्तन यात आहे. त्याशिवाय ते कोरडे बौद्धिक प्रदर्शन ठरू शकते.

५. व्यासांना दिलेली आज्ञा

नारदांनी व्यासांना सांगितले की लोकांच्या कल्याणासाठी असे ग्रंथ रचा, ज्यामुळे भगवद्भक्ती जागृत होईल, वैराग्य निर्माण होईल, धर्माची स्थापना होईल, मन शुद्ध होईल, मोक्षमार्ग सुकर होईल.

याच आज्ञेचे फल म्हणजे श्रीमद्भागवत महापुराण.

६. पूज्य श्रीमज्जगद्गुरु पुरी शंकराचार्यजी महाराज यांच्या विधानाच्या संदर्भात नारदव्यास संवाद अत्यंत समर्पक आहे.

नारदांचा संदेश असा आहे की - कथा लोकांना केवळ भावविवश करू नये;

ती त्यांच्या जीवनाला दिशा द्यावी; ती धर्म, भक्ती, विवेक आणि सदाचार जागवणारी असावी;

श्रोत्यांच्या अंतःकरणात परिवर्तन घडवणारी असावी.

जर कथा या उद्दिष्टांपासून दूर गेली, तर तिचे आत्मपरीक्षण आवश्यक ठरते.

देवर्षी नारदांनी महर्षी वेदव्यासांना दिलेला उपदेश आजच्या प्रत्येक कथावाचक, प्रवचनकार आणि श्रोत्यासाठी तितकाच महत्त्वाचा आहे. कथेचे यश टाळ्यांत, गर्दीत किंवा प्रसिद्धीत नसून, श्रोत्यांच्या अंतःकरणात धर्म, भक्ती, विवेक आणि सदाचार जागृत करण्यात आहे. हीच श्रीमद्भागवताची आणि भारतीय ऋषिपरंपरेची शाश्वत शिकवण आहे.

भारतीय शास्त्रांचा एकमुखी संदेश असा आहे की कथा, प्रवचन, कीर्तन किंवा सत्संग यांची खरी कसोटी श्रोत्यांच्या जीवनातील परिवर्तनात आहे. अंतःकरणशुद्धी, धर्माचरण, सदाचार, भक्ती, वैराग्य आणि आत्मबोध यांची वृद्धी झाली, तरच कथा यशस्वी ठरते. अन्यथा कथा केवळ श्रवणाचा विषय राहते; साधनेचे स्वरूप प्राप्त करत नाही.

भारतीय शास्त्रांचा एकमुखी संदेश असा आहे की कथा, प्रवचन, कीर्तन किंवा सत्संग यांची खरी कसोटी श्रोत्यांच्या जीवनातील परिवर्तनात आहे. अंतःकरणशुद्धी, धर्माचरण, सदाचार, भक्ती, वैराग्य आणि आत्मबोध यांची वृद्धी झाली, तरच कथा यशस्वी ठरते. अन्यथा कथा केवळ श्रवणाचा विषय राहते; साधनेचे स्वरूप प्राप्त करत नाही.

भारतीय परंपरेत कथेचे मूल्य तिच्या भव्यतेने, श्रोत्यांच्या संख्येने किंवा प्रसिद्धीने मोजले जात नाही. तिचे खरे यश तेव्हा मानले जाते, जेव्हा ती मनुष्याच्या अंतःकरणात धर्माची जागृती करते, आत्मबोध घडवते, सदाचार दृढ करते आणि समाजात सत्य, करुणा, संयम व परस्पर प्रेमाची स्थापना करते.

याच अर्थाने पूज्य श्रीमज्जगद्गुरु पुरी शंकराचार्यजी महाराज यांचे विधान कथा-परंपरेवर टीका नसून आत्मनिरीक्षणाचे आवाहन आहे. कथा ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती साधना आहे; केवळ भावनांचा आविष्कार नसून ती आत्मपरिवर्तनाची प्रक्रिया आहे; आणि केवळ धार्मिक कार्यक्रम नसून धर्म, संस्कृती आणि मानवतेच्या पुनर्स्थापनेचे प्रभावी माध्यम आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559